उपजिल्हा रुग्णालय, वरोरा जि.चंद्रपूर येथील ३५ अस्थाई पदे पुढे चालू ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः पदआ - २०१८ /प्र.क्र. १७९ /आरोग्य-३

१० वा मजला, संकुल इमारत,
गो.ते.रुग्णालय, मुंबई-४०० ००१.
तारीख: ०१ जून,२०१८

वाचा -

१) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग,क्रमांक -पदनि २०१५/प्र.क्र.२७२/आरोग्य -३, दिनांक- ०२.०१.२०१७.

२) आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक- संआसे/कक्ष-३/टे-५अ/नव्याने स्थापन उपजिरु वरोरा जि.चंद्रपूर/अपदे/सन १७-१८/६१५४-५५, दिनांक-२८.०५.२०१८.

शासन निर्णय-

उपरोक्त अ.क्र.१ येथील शासन निर्णयान्वये उपजिल्हा रुग्णालय, वरोरा जि. चंद्रपूर या १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयासाठी ३५ पदांची निर्मिती करण्यात आलेली आहे.

२. आता या शासन निर्णयान्वये सोबत जोडलेल्या विवरणपत्रानुसार उप संचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर यांच्या अधिपत्याखालील उपजिल्हा रुग्णालय, वरोरा जि. चंद्रपूर येथील ३५ अस्थाई पदांना दि.०१.०८.२०१७ ते दि.३०.०९.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

३. सदर पदांवरील खर्च खालील लेखाशिर्षातून खर्ची घालण्यात यावा आणि हा खर्च सन २०१८-२०१९ या वर्षाकरीता मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

मागणी क्रमांक-आर-१

२२१० - वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य

०६ - सार्वजनिक आरोग्य

००१ - संचालन व प्रशासन

(०१)(०९) - महाराष्ट्र आरोग्य सेवा विकास प्रकल्पांतर्गत ग्रामिण/कुटीर रुग्णालयांचे उपजिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन (२२०१ ४६२४)

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आपुक,दिनांक- ०५.०३.२०१८ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमीत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०६०११००१०९३०१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shamraoji Kaurte

Digitally signed by Rajendra Shamraoji Kaurte
DN: CN = Rajendra Shamraoji Kaurte, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2018.06.01 13:19:10 +05'30'

(रा.शा.कौरते)
अवरसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई नागपूर
२. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
३. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
४. सहसंचालक,आरोग्य सेवा (रुग्णालये- राज्यस्तर), मुंबई.
५. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन) मुंबई.
६. उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर.
७. जिल्हा शल्य चिकित्सक,जिल्हा रुग्णालय, चंद्रपूर
८. जिल्हा कोषागार अधिकारी, चंद्रपूर.
९. वैद्यकीयअधिक्षक, उपजिल्हा रुग्णालय वरोरा जि. चंद्रपूर
१०. वित्त विभाग (व्यय-१३), मंत्रालय, मुंबई.
११. कार्यासन अधिकारी, सेवा-२/सेवा-३/ सेवा-५/अर्थसंकल्प, सा.आ.वि. मंत्रालय,मुंबई.
१२. निवडनस्ती (आरोग्य-३)

शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक-पदआ-२०१८ /प्र.क्र.१७९ / आरोग्य-३,
विवरणपत्र.

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी व ग्रेड पे (रुपये)	अस्थाई पद संख्या
१	बधिरीकरण शास्त्रज्ञ	१५६००-३९१०० (ग्रेड पे ५४००)	१
२	वैद्यकीय अधिकारी(अस्थीव्यंग)	१५६००-३९१०० (ग्रेड पे ५४००)	१
३	वैद्यकीय अधिकारी (नेत्रशल्य चिकित्सक)	१५६००-३९१०० (ग्रेड पे ५४००)	१
४	वैद्यकीय अधिकारी(दंतचिकित्सा)	१५६००-३९१०० (ग्रेड पे ५४००)	१
५	वैद्यकीय अधिकारी(अपघात कक्ष)	१५६००-३९१०० (ग्रेड पे ५४००)	२
६	वैद्यकीय अधिकारी(वर्ग-३)	९३००-३४८०० (ग्रेड पे ४४००)	१
७	प्रशासकीय अधिकारी	९३००-३४८०० (ग्रेड पे ४४००)	१
७	परिसेविका	९३००-३४८०० (ग्रेड पे ४३००)	३
८	अधिपरिचारीका	९३००-३४८०० (ग्रेड पे ४२००)	१५
९	भौतिकोपचारतज्ञ	९३००-३४८०० (ग्रेड पे ४३००)	१
१०	आहारतज्ञ	९३००-३४८०० (ग्रेड पे ४३००)	१
११	रक्तपेढी तंत्रज्ञ	९३००-३४८०० (ग्रेड पे ४२००)	२
१२	क्ष - किरण तंत्रज्ञ	९३००-३४८०० (ग्रेड पे ४२००)	१
१३	प्रयोगशाळा तंत्रज्ञ	९३००-३४८०० (ग्रेड पे ४२००)	१
१४	ई.सी.जी.तंत्रज्ञ	९३००-३४८०० (ग्रेड पे ४२००)	१
१५	प्रयोगशाळा सहायक	५२००-२०२०० (ग्रेड पे २०००)	२
एकूण			**३५**